# गोव्यात अत्याधुनिक वृद्धाश्रम : भसीन

प्रतिनिधी

पणजी : गोव्हा वेल्हा येथे निवृत्तीनंतरचे प्रथम लक्झरी घर साकारले जात आहे. अत्याधुनिक सोयी सुविधासह उभारले जाणारे हे गृहसंकुल राज्यातील प्रथम असून वृध्दाश्रमाच्या कोणत्याही खुणा दाखवणार नसल्याचे गोल्डन रीट्रिट या पेलासिओ समुहाचे अध्यक्ष विनय भसीन यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

यावेळी मोहन गुप्ता, ॲलन व्हिएगश उपस्थित होते. गोल्डन रीट्रीटतर्फे उच्च प्रतिचे राहणीमान गृहसंकुलामध्ये प्राप्त होणार आहे. त्यामुळे निवृत्तीनंतरचे जीवन सुखमयरित्या साकारण्याच्या अनुभव प्रत्येकाला हवे प्राप्त होणार आहे. गोल्डन रीट्रीट हे शिरदोण नदीपात्राशेजारी दहा एकरमध्ये उभारण्यात आले आहे. येथून विमानतळ, मडगाव, पणजी शहर जवळच असल्याने त्याचाही फायदा येथील रहीवाशांना होणार नाही. येथील अपार्टमेंटमध्ये आपत्कालीन सेवेसाठी आलर्म बटन, चोवीस तास फार्मसी व परीचारिकासह अन्य सुविधाही उपलब्ध केल्या जाणार आहेत. ३१ ऑगस्टपर्यंत अपार्टमेंट खरेदीसाठी २ हजार रुपयांची सवलत देण्यास येणार आहे. प्रत्येक अपार्टमेंट दर प्रति चौरसमीटर ३४ हजार ९०० रुपये आहे. सर्वात लहान ६९ चौरसमीटर अपार्टमेंटचा दर २४ लाख रुपये आहे. दोन इमारतीमध्ये ३२ अपार्टमेंट आहे. गोल्डन रिट्रीटमध्ये ८० अपार्टमेंटची सोय असल्याचे त्यांनी सांगितले.

PUDHARI
22nd August 2009